# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३**

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ३१**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एन-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५३, जिल्हा प्रशासन**<br>**रूपये:- ३,००,००,०००/-**<br>**श्री. धिरज देशमुख** |
| (१) | ५३६० | १० | लातूर तालुका येथील गातेगाव येथे मातंग वस्तीमध्ये समाज मंदिर बांधण्यासाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२) | ५३६१ | १० | लातूर तालुका येथील टाकळी ब. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक भवन बांधण्यासाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | ५३६२ | १० | औसा तालुका येथील कोरंगळा येथे पंडीत वारे यांचे घर ते इब्राहिम शेख यांचे घरापर्यंत पेव्हर ब्लॉक रस्ता करणे, कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | ५३६३ | १० | लातूर तालुका येथील वाघोली येथे दलित वस्तीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक भवन बांधण्यासाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ५३६५ | १० | रेणापूर तालुका येथील डिघोळ देशपांडे येथे दलित वस्तीत महालक्ष्मी मंदिर समोर सभामंडप बांधण्यासाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ५३६८ | १० | औसा तालुका येथील येल्लोरी येथे राजेंद्रर धोत्रे ते भिमाशंकर वाळके यांचे घरापर्यंत सिमेंट / पेव्हर ब्लॉक रस्ता करणे, सदर कामांसाठी निधीची तरतूद करण्याची आवश्यकता, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एन-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**रूपये:- १०,००,००,०००/-**<br>**श्री. बळवंत वानखडे** |
| (७) | ५६९१ | १० | न. प. दर्यापूर जि. अमरावती या नगर परिषदेची २९ जून २०२१ रोजी शासन अधिसूचनेनुसार हद्दवाढ झाली असून यात दर्यापूर शहारा लगत असलेल्या मौजे जहानपुर , पेठ इतबारपूर , गायवाडी , शिवर , लेहेगाव या गावातील बहुतांश भागांचा समावेश झालेला असणे सदर समाविष्ट झालेल्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात मूलभूत सुविधेचा अभाव असणे , स्थानिक लोकप्रतिनिधीनी हद्दवाढीच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत मा. मंत्री नगरविकास यांना लेखी पत्राद्वारे कळवले असणे , परंतु अद्यापही निधी उपलब्ध झालेला नसणे , यामुळे या भागातील नांगरिकामध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एन-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण**<br>**रूपये:- ६५,६०,५४,७०,०००/-**<br>**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (८) | ५७३० | १० | तिवसा जि. अमरावती येथील मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतीगृह नविन इमारतीच्या बांधकामासाठी शासनाने दि. 19 सप्टेंबर 2022 ला प्रशासकीय मान्यता रुपये 12.99 कोटी इतक्या रक्कमेच्या निधीसाठी देण्यात आलेली असणे परंतु अद्यापही बांधकामासाठी अंदाजपत्रकानुसार निधी प्राप्त झालेला नसणे, तिवसा येथे शासकीय मागासवर्गीय मुलींचे वसतीगृह अत्यंत आवश्यक असून त्याकरिता निधी तात्काळ मिळावा यामुळे पुढील शैक्षणिक वर्षात मुलींच्या राहण्याच्या दृष्टीने वसतीगृह उपलब्ध होईल याकरीता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (९) | ५५३५ | १० | मुंबईतील दादर येथील इंदू मिल परिसरात उभारण्यात येत असलेले भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाचे काम शासनाने कंत्राटदारांशी केलेल्या करारानुसार माहे फेब्रुवारी, 2021 मध्ये पूर्ण होणे अपेक्षित होते तथापि हे काम संथगतीने होत असल्याचे माहे में,2022 मध्ये निदर्शनास आलेले असणे, स्मारकाचे काम सनियंत्रण जलदगतीने व्हावे यासाठी तत्कालीन शासनाने तत्कालीन मा.समाजकल्याण मंत्री यांचे अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळाची उपसमिती नेमून या समितीमध्ये तत्कालीन मा.नगरविकास मंत्री व विद्यमान मा.मुख्यमंत्री तत्कालीन मा.शालेय शिक्षण मंत्री यांचाच समोवश असणे, या |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | मंत्रीमंडळ उपसमितीने इंदू मिल (दादर, मुंबई) येथील प्रकल्पाचे ठिकाणी तसेच उत्तर प्रदेशातील गाझियाबाद येथे जाऊन भव्य पुतळा प्रतिकृतीची पाहणी केली असून पुतळा प्रतिकृतीमध्ये काही बदल सुचविले असणे, स्मारक प्रकल्पावर आतापर्यंत 245 कोटी रुपये खर्च झाले असून या वर्षासाठी आणखी 200 कोटीचा निधी प्रकल्पासाठी राखून ठेवण्यात आल्याचे तसेच प्रकल्पाचे काम मार्च, 2024 पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे स्मारक मंत्रीमंडळ उपसमितीचे तत्कालीन मा. अध्यक्ष व मा.सामाजिक न्याय मंत्री यांनी त्याचवेळी प्रसार माध्यमाद्वारे सांगितल्याचेही निदर्शनास आले असणे, सदर स्मारकाचे काम तातडीने पुर्ण करण्याची शासनाने करावयाची कार्यवाही. |
| (१०) | ५५३७ | १० | सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या वतीने राज्यात मुला-मुलींची ४४५ वसतिगृहे चालवली जातात असून त्यामध्ये ५० हजारांवर विद्यार्थी शिक्षण घेत असणे, सामाजिक न्याय विभागाच्या वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना माहे फेब्रुवारी २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीतील ११ महिन्यांचा निर्वाह भत्ता मिळाला नसल्याचे माहे जाने २०२३ वा त्यादरम्यान निदर्शनास आले असणे, सदरील प्रलंबित निर्वाह भत्ता लाभार्थ्यांना वितरीत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (११) | ५५३९ | १० | राज्यातील आर्थिक व दुर्बल घटकांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ सेवा योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तिवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तिवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती योजना या पाच योजना राज्यात राबविल्या जात असणे, राज्यात सदरील योजनांसाठी राज्य शासनाच्या योजनांचे २२ लाख ८७ हजार तर केंद्र शासन पुरस्कृत योजनांचे १२ लाख २१ हजार ६०० असे एकूण जवळपास ३५ लाख ८ हजार ६०० हून अधिक लाभार्थी असल्याचे निदर्शनास आलेले असणे, त्यानुसार सदरील योजनांच्या लाभार्थ्यामध्ये जेष्ठ नागरिक, दिव्यांग, विधवा महिला यांचे प्रमाण बघता सदरील लाभार्थ्यांना आर्थिक सहाय्याची रक्कम पोस्टाच्या माध्यमातून रोख स्वरूपात घरपोच देण्यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ५५४४ | १० | राज्यात सामाजिक न्याय विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य, गणवेश भत्ता, छत्री, रेनकोट, प्रकल्प अहवाल भत्ता, इत्यादी देण्यात येत असणे, शैक्षणिक वर्ष 2022-23 मधील निर्वाह भत्ता व अन्य सर्वच भत्ते विद्यार्थ्यांना अद्याप देण्यात आलेले नाहीत, असे जानेवारी 2023 वा त्या सुमारास निदर्शनास आले असणे, लोकप्रतिनिधीनी याबाबत मागणी केली असता सदर भत्ते अदा करण्यासाठी शासनाकडे निधी उपलब्ध नसल्याची बाब उघड झाली असणे, वसतिगृहातील विद्यार्थ्यांना तातडीने सर्व भत्ते अदा करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१३) | ५५४७ | १० | राज्यात शाहू, फुले, आंबेडकर निवासी आश्रमशाळांना नियमित वेतनश्रेणीनुसार अनुदान देण्याच्या मागणीसाठी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी आझाद मैदान, मुंबई येथे बेमुदत उपोषण केल्याचे निदर्शनास आलेले असणे, राज्य शासनाने सन २०१९ मध्ये १६५ पात्र आश्रमशाळांना २०% टक्के अनुदान देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी करुन वेतनश्रेणी लागू करण्यात येणार असल्याचे निदर्शनास येणे, केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत सन १९८८-१९९९ मध्ये स्वयंसेवी संस्थांकडून चालविल्या जाणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठीच्या निवासी आणि अनिवासी प्राथमिक तसेच माध्यमिक शाळांसाठी सहाय्यक अनुदाने योजना सुरु करुन सन २००६ मध्ये राज्य शासनाकडे वर्ग करण्यात आलेल्या या शाळांना अनुदान लागू करण्याबाबतच्या इत्यादी मागण्या शासनाकडे केलेल्या असणे, उक्त प्रकरणी शासनाने निवासी आश्रम शाळांना त्वरित अनुदान व वेतनश्रेणी लागू करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१४) | ५५५१ | १० | राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र.सफाई २०१५/प्र.क्र.२६८ महामंडळे दि.११ मार्च २०१६ मधील परिच्छेद ३ (१) अन्वये वाल्मिकी मेहतर समाजाला आर्थिक संरक्षण देण्यासाठी सफाई कामगारांच्या नियुक्ती बाबत लाड समितीने शिफारस केल्याप्रमाणे वारसा पद्धत पुढे चालू ठेवण्यास मान्यता दिलेली असणे, त्याचप्रमाणे सदर शासन निर्णयातील परिच्छेद ४३ (३) नुसार सफाई कर्मचारी म्हणून सेवा निवृत्ती झालेल्या किंवा होणाऱ्या अथवा सेवेत असताना निधन पावलेल्या फक्त अनुसूचित जाती मधील सफाई कामगारनाच द्यावा असे सुद्धा नमूद केल्याचे निदर्शनास आलेल असणे, त्यामुळे इतर समाजातील सफाई कामगारांवर अन्याय होत असल्याचे व समाजातील जातीय तेढ निर्माण होवू नये व सर्वांना समान न्याय देण्यासाठी सदरच्या शासन निर्णयात सुधारणा करून सर्व जातीच्या सफाई कामगारांना वारसा हक्काने सेवेत सामावून घेण्याबाबत सुधारित शासन निर्णय काढणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | ५५५३ | १० | सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहामध्ये राहणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना फेब्रु,2022 पासून निर्वाहभत्ता देण्यांत आलेला नसणे, विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता देण्यांत येत नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची पाळी निर्माण झाली असणे, तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या राजर्षी शाहू महाराज परदेशी शिष्यवृत्ती योजनेच्या शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे अनेक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले असणे, एका सत्रातील एखाद्या विषयात विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यावर 'एटीकेटी' मधून पुढील सत्रात प्रवेश केल्यानंतर अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व निर्वाह भत्ता इत्यादी शासनाकडून बंद करण्यात |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आल्याचे निदर्शनास आलेले असणे, उक्त प्रकरणी परदेशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ मिळावा त्यांना उच्च शिक्षण घेता यावे याकरीता शासनाने परदेशी शिष्यवृत्ती योजनेच्या धोरणाबाबत पुनर्विचार करण्यासंदर्भात करावयाची कार्यवाही व उपाययोजना, |
| (१६) | ५५५४ | १० | मागासवर्गीय विद्यार्थ्यांची वसतिगृहे व निवासी शाळांसाठी स्पर्धा परीक्षांची पुस्तके प्रत्यक्षात मिळाली नसतानाही या पुस्तकांपोटी ३२ कोटी ३७ लक्ष रुपये दि. १८ ऑक्टोबर २०२२ रोजी सहायक समाजकल्याण आयुक्त सोलापूर यांनी कोषागारातून काढल्याची बाब निदर्शनास आली असणे, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजने अंतर्गत शब्दालय पब्लिकेशन हाऊस अहमदनगर या पुरवठादाराकडून खरेदी करावयाच्या व दि. ५ जुलै २०२२ रोजी समाजकल्याण आयुक्त पुणे यांनी पुरवठा आदेश दिलेल्या ३६ कोटी रुपयांच्या पुस्तक खरेदीमध्ये भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार झाल्यामुळे या पुस्तक खरेदीला दि. २३ डिसेंबर २०२२ रोजी शासनाच्या सामाजिक न्याय विभागाने स्थगिती दिलेली असणे, शासनाने चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (१७) | ५६७१ | १०० | अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील वस्त्यांचा विकास करण्याच्या दृष्टीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत संविधान सभागृह उभारण्यास सुमारे 40 लाख रुपये निधी देण्यात येत असणे, याअंतर्गत प्रत्येक तालुका स्तरावर एक संविधान सभागृह उभे केले जावे, याबाबत होत असलेली मागणी, त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१८) | ५६७२ | १०० | अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील पदव्युत्तर पदवी किंवा तत्सम उच्च शिक्षणासाठी परदेशातील निवडक विद्यापीठात प्रवेश मिळवल्यास त्यांना राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजनेंतर्गत शिष्यवृत्ती देण्यात येत असणे, सदर योजनेत लाभार्थी संख्या 75 वरून वाढवून 200 करण्याची होत असलेली मागणी, त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१९) | ५६७४ | १०० | अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील जिल्ह्याचे ठिकाण किंवा मोठ्या शहरात राहणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळू शकला नाही, अशा विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेंतर्गत शिष्यवृत्ती देण्यात येत असणे, सदर योजनेतील शिष्यवृत्तीची देयके निधीच्या तरतुदी अभावी प्रलंबित असणे, तसेच लाभार्थी संख्येत वाढ करण्याची व योजनेचा विस्तार तालुका स्तरावर करण्याची होत असलेली मागणी, त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२०) | ५६७८ | १०० | अनुसूचित जातीतील मुला-मुलींना शिक्षण घेण्यासाठी सुलभता यावी यासाठी चालवण्यात येणारी शासकीय वसतिगृहे दुरावस्थेत असणे, बीड जिल्ह्यातील बीड, परळी, माजलगाव येथील मुलींच्या वसतिगृहात सुरक्षा व अन्य व्यवस्था तसेच वॉर्डन व अन्य कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२१) | ५६८० | १०० | अनुसूचित जातीतील आर्थिक दुर्बल भूमिहीन शेतमजुरांना कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण योजनेअंतर्गत कसण्यासाठी जमीन उपलब्ध करून देण्यात येत असणे, सदर योजनेअंतर्गत निधी अभावी शेकडो प्रस्ताव प्रलंबित राहत असणे, तसेच सदर योजनेअंतर्गत दिली जाणारी रक्कम ही कोरडवाहू किंवा बागायती जमीन खरेदी करण्यासाठी अत्यंत कमी असणे व सदर रक्कमेमध्ये दुप्पट वाढ करण्याची मागणी प्रस्तावित असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एन-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**रूपये:- ३९,१२,२१,२५,०००/-**<br>**श्री. चेतन तुपे** |
| (२२) | ५६२५ | १०० | सोयगाव (तालुका जावळी जिल्हा सातारा) येथील बौध्द समाज मंदिर निधी अभावे काम अपुर्ण राहिले आहे त्यामुळे सदर बौध्द मंदिरासाठी निधी देण्यात यावा याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (२३) | ५६५८ | १०० | वयोवृद्ध व्यक्ती, एकटे राहणारे ज्येष्ठ नागरिक, वयोवृद्ध निराधार अशा व्यक्तींना विविध मध्यम व दुर्धर आजारांना सामोरे जावे लागते, काही आजार शरीरात बळावत असताना काही त्रास नसल्याने त्यांचे वेळेवर निदान होत नाही, त्यामुळे वयोवृद्ध व्यक्तींच्या वर्षातून किमान दोन वेळा विविध आरोग्य विषयक तपासण्या करण्यात येण्याची बाब गरजेची असणे, राज्य शासनाने वयोवृद्ध व्यक्तींची वर्षातून किमान एक वेळा सर्व प्रकारची आरोग्य विषयक तपासण्या मोफत करण्यासाठी आरोग्य विभागाच्या सहाय्याने विशेष योजना प्रस्तावित केलेली असणे, सदर योजना पूर्ण क्षमतेने सुरू करण्याबाबत होत असलेली मागणी, त्यावर करावयाची कार्यवाही. |
| (२४) | ५६६१ | १०० | लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ अंतर्गत ऊसतोड कामगारांच्या पाल्यांच्या शिक्षणात खंड पडू नये यासाठी संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजना सुरू करण्यात आली असणे, या योजनेतून ऊसतोड कामगार बहुल भगत एकूण 84 वसतिगृहे उभारणे प्रस्तावित असणे, सदर योजनेच्या पहिल्या टप्प्यात मंजूर 20 वसतिगृहे आगामी शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वीच सुरू |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | करून, सर्व सुविधा उपलब्ध करून, ऊसतोड कामगार पाल्यांच्या निवासाची सोय करून देण्यात यावी, याबाबत लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही. |
| (२५) | ५६६४ | १०० | लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ अंतर्गत ऊसतोड कामगारांचे सातत्याने होत असलेले अपघात चिंतनीय बाब असणे, ऊसतोड कामगारांना कोणत्याही विम्याचे कवच नसल्याने त्यांचा अपघात झाल्यास उपचारासाठी, इतर आरोग्य विषयक समस्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच मयत झाल्यास कुटुंबाला आधारासाठी सहाय्यक अनुदान देणारी समावेशक विमा योजना सुरू करण्यात यावी, याबाबत लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही. |
| (२६) | ५६६६ | १०० | लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ अंतर्गत ऊसतोड कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबविण्यात याव्यात यासाठी त्यांची संख्या निश्चित करणे अनिवार्य असणे, त्यामुळे महामंडळ अंतर्गत ठप्प असलेली ऊसतोड कामगारांची नोंदणी करून त्यांना ओळखपत्र देण्याची प्रक्रिया पुन्हा सुरू करून तातडीने पूर्ण करण्यात यावी, याबाबत लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, त्यावर करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. |
| (२७) | ५६६९ | १०० | विशेष सहाय्य योननेतील संजय गांधी निराधार, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजनेंतर्गत लाभ मिळवण्यासाठी वृद्ध-निराधार व्यक्तींना दरवर्षी हयात प्रमाणपत्र सादर करावे लागत असणे, सदर प्रमाणपत्र उपलब्ध करून सादर करण्यात वेळोवेळी अडचणी येत असणे व यामुळे ज्येष्ठ नागरिक व एकटे राहणारे निराधार यांचे हयात प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र आदी कागदपत्रे त्यांच्या निवासाच्या ठिकाणी उपलब्ध करून देण्याची सोय करण्याबाबत होत असलेली मागणी, त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (२८) | ५६३७ | १० | राज्य व केंद्र शासनातर्फे दिव्याग ,निराधार , विधवा , अनाथ , परितक्त महिला ,आणि वृद्धानं श्रावण बाळ , संजय गांधी , इंदिरा गांधी निवृतिवेतन व वृद्धापकाळ योजने अंतर्गत प्रती माह १००० रुपये महिना देण्यात येत असणे सदरील रक्कम महागाईच्या काळात अत्यंत तुटपुजी असल्याने सदरील रक्कमेत वाढ करून किमान २५०० रु अनुदान देण्याची लाभार्थी कडून मागणी असणे मागणी असणे , तसेच त्यांना मिळणाऱ्या अनुदानात वाढ करून २५०० प्रती महिना लाभ देण्याची नितांत आवश्यकता असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२९) | ५६४१ | १० | राज्यातील दिव्यांगाच्या शाळा कर्मशाळेवरील कार्यरत वसतीगृह अधीक्षक, गृहपाल यांचे वेतनश्रेणीत सुधारणा करणेबाबतचा अहवाल मा. आयुक्त , दिव्यांग कल्याण यांनी शासनास दि.२/३/२०२२ रोजी सादर केलेला असणे , राज्य वेतन सुधारणा समिती वेतन आयोग समोर (मा. बक्षी समिती ) मंत्रालय , महाराष्ट्र राज्य यांच्या समोर सुनावणी होऊन बाराच काळ झाला असून अद्यापपर्यंत खंड २ प्रकाशित न झाल्याने राज्यातील दिव्यांगाच्या शाळा कर्मशाळेवरील कार्यरत वसतीगृह अधीक्षक, गृहपाल यांची वेतनश्रेणी अद्याप लागू झाली नसणे असल्यास राज्यातील दिव्यांगांच्या अनुदानीत विशेष शाळा, कर्मशाळा संलग्न वसतीगृह अधीक्षक/गृहपाल यांना ६ व्या वेतन आयोगातील त्रुटी दूर करुन ७ व्या वेतन आयोगात एस, १० लागू करण्याची नितांत आवश्यकता असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |
| | | | **मागणी क्रमांक: एन-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४०५९, सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- २०,००,०००/-**<br>**श्री. बळवंत वानखडे** |
| (३०) | ५६५१ | १० | आंतरराष्ट्रीय श्रद्धास्थळ असलेल्या दीक्षाभूमीच्या विकास आराखड्याची अंमलबजावणी करण्यासाठी काय कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने १८ जानेवारी २०२३ रोजी राज्य सरकार व नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला केली असून ८ फेब्रुवारी २०२३ पर्यंत याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्याबाबत आदेशित केलेले असणे , जगभरातील उपासक आणि उपासिकांना येथे मूलभूत सुविधा निर्माण होण्याच्या दृष्टीने तसेच कोटी अनुयायांचा श्रद्धास्थान असणाऱ्या या दीक्षाभूमीच्या नवीन विकास आराखड्यास मंजुरी देऊन येथील विकास आराखाड्यचे काम तातडीने सुरू करण्याची नितांत आवश्यकता असणे , याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एन-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचेकल्याण यांवरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- ५,२५,००,०२,०००/-**<br>**श्री. बळवंत वानखडे** |
| (३१) | ५६७७ | १० | सामाजिक न्याय विभागामार्फत राबवण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमलबजाबवणी करिता एकूण ७ प्रादेशिक उपायुक्त ३५ जिल्ह्यात सहायक आयुक्त , जिल्हा जात पडताळणी समिती कार्यालय , त्याचप्रमाणे मागासवर्गीय बेरोजगारांना स्वयंरोजगारांकरिता अर्थसंहाय करण्यासाठी जिल्हा स्तरावर महात्मा फुले आर्थिक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | विकास महामंडळ , संत रोहिदास महामंडळ , वसंतराव नाईक भटक्या जमाती महामंडळ , क्षेत्रीय कार्यालय अभ्यासिका , एकाच इमारतीत असून या भवनात भेट देणाऱ्या अभ्यागत , लोकप्रतिनिधी , लाभार्थी , विद्यार्थी , पालक , यांची गैरसोय होऊ नये म्हणून उपहारगृहे बांधण्यात आली असून सदर उपहारगृहे अद्यापपर्यंत कार्यान्वित करण्यात न येणे , सदर उपहारगृहे मागासवर्गीय पुरुष , महिला , बचत गट , व स्वयंसेवी संस्थांना देऊन रोजगार उपलब्ध करून देण्याची मागणी विविध सामाजिक संस्था तसेच लोकप्रतिनिधी कडून होत असणे , डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवणातील उपहारगृहे कार्यान्वित करण्याची नितांत आवश्यकता , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २० मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई